महासागर
मंगळवार ०७जानेवारी २०२५
भंडारा
पान ३

# साकोली तहसील कार्यालया मार्फत एकोडी येथे सुशासन सप्ताह शिबीर संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली :** साकोली तहसील कार्यालया मार्फत समाज मंदिर बाजार चौक एकोडी येथे सुशासन सप्ताह शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये सातबारा ९५, इकंम सर्टिफिकेट ९, आधारलिंक अपडेट १२, हलपनामा ५, वर्ग दोन मधून वर्ग एक मध्ये परावर्तित केसेस ५, इतर आवश्यक कागदपत्रे बनवून देण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी अजय धांडे, तलाठी जी.डी. शिवणकर, बाम्पेवाडा तलाठी मेश्राम, चांदोरी तलाठी डहाट, तसेच ग्रामपंचायत एकोडी येथील सरपंच संजय खोब्रागडे, ग्रामपंचायत सदस्य भावेश कोटांगले, सुखराम बन्सोड, सामाजिक कार्यकर्ते मनोज कोटांगले, लालचंद गणवीर, कोतवाल दिलीप शहा, प्रमोद मेश्राम, मचिंद्र लोणारे इतर गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. या शिबिराचा परिसरातील जनतेनी लाभ घेतला व सुशासन शिबीर यशस्वी केले.

# जिल्हा माहिती कार्यालयात दर्पणकारांना अभिवादन



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०६:** बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी, १८३२ रोजी महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरु केले. हाच दिवस महाराष्ट्रात 'मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन इमारत दुसरा माळा, भंडारा येथे मराठी वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस जिल्हा माहिती अधिकारी श्रीमती शैलजा वाघ-दांदळे, व संपादक मनोहर मेश्राम, यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाचे विजय जाधव, बंडूसिंग राठोड, सुनिल फुलसुंगे, घनश्याम सपाटे, श्रीमती रेखा निनावे, दिलेश भुरे, सुदेश खवास या कार्यक्रमास उपस्थित होते.

# वाघाचे चार तुकडे करून जंगलात फेकले

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०६:** आज दिनांक ०६जानेवारी २०२५ रोजी भंडारा वन विभाग अंतर्गत येणाऱ्या तुमसर वनक्षेत्रातील सहवनक्षेत्र तुमसर नियतक्षेत्र झांजरिय कक्ष क्रमांक ७४BRइ मध्ये तीन पुलीया तलावाच्या बांधास लागून वन्यप्राणी वाघ मृत अवस्थेत आढळून आला.

घटनेची माहिती प्राप्त होताच वनधिकारी वनकर्मचारी पथकासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या प्रमाणभूत कार्यपद्धतीनुसार (SOP) कार्यवाही करण्यात आली.

पशुधन विकास अधिकारी यांचा समावेश असलेली समिती गठित करण्यात आली. या वेळी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) चे प्रतिनिधी श्री.अनिल दसहरे व प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे प्रतिनिधी म्हणून भंडारा जिल्हा चे मानद वन्यजीव रक्षक श्री. पंकज देशमुख व SEAT स्वयंसेवी संस्थेचे श्री. शाहीद खान उपस्थीत होते. पशुधन विकास अधिकारी नाकाडोंगरी डॉ.बारापात्रे व पशुधन विकास अधिकारी



हरदोली डॉ. शुभम थोरात, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. कल्पना गायकवाड, पशुधन विकस अधिकारी, सिहोरा डॉ. आशिष गटकळ, नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प पशुवैध्यकिय अधिकारी डॉ. मेघराज तुलावी यांचा समावेश असलेली समिती गठित करण्यात आली व त्यांच्या चमुने मृत वाघ याचे शवविच्छेदन केले. सदर वन्य प्राण्याचा मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट असून मृत्यूच्या कारणाचा शोध घेण्यात येत आहे.

मृत वाघिणीच्या शरीराचे चार भाग कापून जे घटनास्थळी फेकण्यात आले होते.

वन्यप्राणी वाघ हा मादी जातीचा वयस्कर साधारण अंदाजे ३ वर्ष वय असल्याचे आढळून आले. सदर वन्य प्राणी वाघाचे सर्व अवयव साबूत असून शव विच्छेदनाची संपूर्ण कार्यवाही राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण च्या प्रमाणभूत कार्यप्रणालीनुसार (SOP) करण्यात आली व तदनंतर त्याचे शव दहन करण्यात आले.

मृत वन्य प्राण्याचे अवयवांचे नमुने घेण्यात आले असून ते उत्तरीय तपासणी करिता प्रयोगशाळेत पाठवण्यात येणार आहेत. प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपासाची कार्यवाही उपवनसंरक्षक, भंडारा श्री.राहुल गवई यांचे मार्गदर्शनात, प्रकाष्ट निष्काशन अधिकारी श्री.रितेश भोंगाडे व वनपरिक्षेत्र अधिकारी तुमसर श्री. रहांगडाले हे करीत आहेत.

# चॅम्पियनशीप सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक लेंडेझरी केंद्राने पटकविला

**महासागर प्रतिनिधी**

**जांब (लोहारा)दि.०६:** तुमसर तालुका अंतर्गत तालुका स्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव २०२४-२५ चे आयोजन दिनांक ०२ जानेवारी ते ०४ जानेवारी २०२५ रोजी डोंगरी बुज. येथे करण्यात आले होते.

तालुक्यातील एकूण ११ केंद्रातील जि प प्राथ व माध्य. शाळांनी सहभाग घेतला होता. यामध्ये सलग दुसऱ्या वर्षी लेंडेझरी केंद्राने प्राविण्य संपादन केले.

यामध्ये प्रामुख्याने जिप रोंघा शाळा फायनल माध्य. मुले खो खो, माध्य.मुले कबड्डी पिटेसुर, प्राथ. मुले कबड्डी गोवारीटोला, माध्य.मुली कबड्डी लेंडेझरी यांनी प्रथम क्रमांक पटकावला.



वैयक्तिक खेळात जिप रोंघा शाळेने माध्य. मुले लांब उडी प्रथम क्रमांक, माध्य. मुले १०० मी दौड प्रथम क्रमांक, माध्य. मुले ४०० मी दौड प्रथम क्रमांक, प्राथ. मुले १०० मी दौड प्रथम क्रमांक, प्राथ. मुली १०० मी दौड प्रथम क्रमांक, प्राथ. मुली ४०० मी दौड द्वितीय क्रमांक पटकावला.

केंद्रातील सर्व विजयी चमूचे अभिनंदन केंद्राचे केंद्रप्रमुख . ओमन सावतवान, केंद्र मुख्याध्यापिका सृष्टी मुलताम , उ. श्रे. मुख्या. धावडे , रोंघा शाळेचे मुख्या मनोज रामटेके, राजू निखारे , केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी केले.

# गावचा एकोपा मंडई उत्सवाचे आकर्षण असावे !

## रनेळा येथे मनोहर मेश्राम यांचे प्रतिपादन

**महासागर प्रतिनिधी**

**पवनी दि.०६:** सध्या जिल्हयात मंडई उत्सवाची धूम असून कार्यक्रमाची भरगच्च मेजवानी असते. दरम्यान मनोरंजनात्मक व सामाजिक प्रबोधनाच्या कार्यक्रमातून गावचा एकोपा मंडई उत्सवाचे आकर्षण असावे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार मनोहर मेश्राम यांनी उद्घाटनप्रसंगी रनेळा येथे केले. ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन समस्त गावकरी रनेळा यांनी केले होते. मेश्राम पुढे म्हणाले गावची सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगती होण्याहेतू जनकल्याणकारी कार्यक्रमाचे आयोजन होणे हे गौरवाची बाब असून मंडई उत्सवातून अनेक लोककलांचे सादरीकरण होत असते. यात गोंधळ, तमाशा, नाटक, लावणी, दंडार यासारख्या कलात्मक कार्यक्रमाचा सहभाग असतो. यातून लोककला जोपासतांना समतामुलक समाजाची निर्मिती करण्यास हातभार लागतो असे सांगून संत



गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गाव गणराज्याच्या संकल्पनेतून गावाला समृद्ध करण्यासाठी गावकऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमोद डोये सरपंच ग्रामपंचायत रनेळा यांनी ग्राम स्वच्छता अभियानात गावकऱ्यांनी दिलेल्या योगदानाची प्रशंसा करीत रनेळा गाव संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्राम स्वच्छता अभियानात तालुक्याच्या प्रथम पटलावर आल्याचे सांगून गावकऱ्यांच्या परिश्रमाचा विजय असल्याचे म्हणाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जगजीवन खंडाळे पोलीस पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार चंद्रशेखर कठाने, लेकराम मेंढे, शिवसेना नेते किशोर मेंढे, अभिमन मेश्राम, हेमराज डोकरे उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य सुरेश मेश्राम, यमुताई सपाटे, प्रमिला हत्तीमारे, मोनाली फुंडे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हरिभाऊ खोपे, गणेश ब्राह्मणकर, नरेश खोब्रागडे, विनोद खोब्रागडे इत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

# जागृती विद्यालय कोसरा येथे सावित्रीबाई फुले जयंती व बालिकादिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**वरठी दि.०६:** जागृती विद्यालय कोसरा येथे सावित्रीबाई फुले जयंती व बालिकादिन साजरा करण्यात आला.

विद्यार्थिनींनी कार्यक्रमात सहभाग घेऊन बालिकादिन साजरा केला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राजली चिचमलकर हिने आपल्या मनोगतातून सावित्रीबाई यांच्या जिवन कार्यावर व समाजकार्यांवर प्रकाश टाकला. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता शाळेचे मुख्याध्यापक बिपीन कुर्झेकर सर्व विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन तनु तलमले व आभार प्रदर्शन संचिता मेश्राम हिने केला.

# नागरी सुविधा देण्यात ग्रामपंचायत अपयशी

**वरठी:** भंडारा जिल्हयाचे मुख्य रेल्वेस्थानक आणि महत्वाची बाजारपेठ असलेल्या वरठी शहराची ओळख समस्याचे माहेरघर म्हणून बनली आहे. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे येथील नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा मिळणे कठीण झाले आहे. स्वच्छता, वीज, पाणी, रस्ते, अतिक्रमण हे प्रश्न गंभीर झाले असताना ग्रामपंचायत पदाधिकारी याकडे डोळेझाक करीत आहे. वरठी येथे रेल्वेस्टेशन असल्याने येथे मोठी बाजारपेठही आहे. परिसरातील अनेक गावखेड्यातील नागरिकांची नेहमीच येथे वर्दळ असते.

गावाची लोकसंख्याही १३ हजारावर आहे. असे असतानाही विकासाच्या बाबतीत अतिशय मागासलेले असल्याचे दिसून येते.

ग्रामपंचायतीकडे कचरा व्यवस्थापनाचे कोणतेही नियोजन नसल्याने गावाबाहेर रस्त्याच्या कडेला कचरा फेकण्यात येतो. यामुळे तुमसरकडून वरठीत येणाऱ्यांचे स्वागत घाण व दुर्गंधीने होते. तर शहरवासियांचे आरोग्य व प्रदुषणाची समस्या निर्माण झाली आहे. रस्त्यावरील खड्डे शरीराची हाडे मोडणारी आहेत. येथील वीजेची अडचण लक्षात घेऊन वीज कंपनीने एक पॉवर हॉऊस उभारले आहे. मात्र विजेची मागणी अधिक असल्याने अनेकदा वीज पुरवठा खंडीत होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. बाजारपेठ व शहराचा विस्तार होत असल्याने येथे समस्याही वाढत आहेत. सर्वत्र अतिक्रमण वाढत असल्याने रस्ते निरूंद होत आहेत. याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वाघाये महाविद्यालय सानगडी येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी दि.०६:** स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय सानगडी येथे प्राचार्य डॉ. प्रकाश सिंग यांच्या मार्गदर्शनात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व उन्नत भारत अभियान विभागाअंतर्गत करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. डॉ. राजेश भेंडारकर व उन्नत भारत अभियान समन्वयक प्रा. धवनकुमार करेले यांच्या उपस्थितीत शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरा अंतर्गत वैद्यकीय अधिकारी डॉ. आचल कापसे प्राथमिक आरोग्य केंद्र सानगडी यांच्या मार्गदर्शनात शालेय मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यात सर्व विद्यार्थ्यांची सिकलसेल, बी.पी. शुगर, एच. बी, सी.बी.सी तपासणी करण्यात आली. यावेळी आरोग्य कर्मचारी यशवंत भोयर आरोग्य सहाय्यक, पी. डी. कंगाले आरोग्य सहाय्यक, श्रीला कानेकर आरोग्य सहाय्यिका तसेच सुधाकर जांभुळकर आरोग्य सेवक, वंदना भस्मे आरोग्य सेविका, आणि लीना मेश्राम असिस्टंट हजर होते. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक गण व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# बॅटरीची चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**लाखनी :** लाखनी पोलीस स्टेशन अंतर्गत आहे कि, यातील आरोपी १) प्रमोद उर्फ काल्या अशोक बावनकुळे वय ३२ वर्ष रा. मुरमाडी/ सावरी (२) एजाज सय्यद रहमद सय्यद वय ३४ वर्ष रा. मुरमाडी/ सावरी ३) मंगेश अमृत टिचकुले वय ३६ वर्ष रा. सावरी/मुरमाडी ४) रमेश शोभामल मेघराजानी वय ७५ वर्ष रा. बाजार वार्ड लाखनी यांनी दिनांक २७/ १२/२०२४रोजी मातोश्री आश्राम केसलवाडा /वाघ येथे संगणमत करुन फिर्यादी किशोर मोतीराम हलमारे वय ५७ वर्ष जात-कुणबी रा. सेलोटी ह. मु. मातोश्री आश्राम केसलवाडा वाघ काम करीत असलेल्या मातोश्री आश्रम मधील दलीराम गिऱ्हेपुंजे यांचे मालकीचे महिन्द्रा सरपंच ट्रॅक्टर आश्रम मध्ये ठेवले असतांना ट्रॅक्टरची बॅटरी सुना मौका पाहुन चोरुन नेण्याचा प्रयत्न करतांना मिळुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०३ (२), ६२,३ (५) बी.एन.एस.-२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

# खैरलांजी येथे सभागृह लोकार्पण व आदिवासी समाज प्रबोधन मेळावा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली :** तालुक्यातील खैरलांजी येथे क्रांतीवीर बिरसा मुंडा सभागृह लोकार्पण व आदिवासी समाज प्रबोधन मेळावा नॅशनल आदिवासी पिपल्स, महिला व युथ फेडरेशन खैरलांजी च्यावतीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन साकोली चे तालुका अध्यक्ष जगनजी उईके कार्यक्रमाचे उदघाटक अविनाशजी ब्राम्हणकर जि.प.सदस्य भंडारा, सह उदघाटक बिसनजी सयाम अध्यक्ष आदिवासी विकास प्रकल्प भंडारा तर प्रमुख पाहुणे म्हणून नेपालजी रंगारी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य भाजपा, अमोल हलमारे तालुका अध्यक्ष भाजपा साकोली, बी. डी. खांडवाये तालुका अध्यक्ष ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन साकोली, एन. टी. मेळे विस्तार अधिकारी पं. स. साकोली, प्रमेश मरस्कोल्हे सर , हितेश उईके सर, अचल मेश्राम सामाजिक काय. पुंजाताई देशमुख सरपंच पाथरी, कुंदाताई कुंभरे तालुका अध्यक्ष नॅशनल आदिवासी महिला फेडरेशन साकोली, पवनकुमार



टेकाम उपाध्यक्ष नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन साकोली, केशव भलावी तालुका सचिव नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन साकोली, आदित्य मेश्राम पोलीस पाटील खैरलांजी, मोहन बोरकर तमुस अध्यक्ष पाथरी, नंदु गेडाम सामाजिक काय., वैशालीताई जयस्वाल आशा सेविका, राकेश घोरमारे ग्राम पंचायत सदस्य, कविताताई जांभुळकर ग्राम पंचायत सदस्य, कल्पनाताई साखरे ग्राम पंचायत सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाप्रसंगी सकाळी ओमप्रकाश कुंभरे तालुका कोषाध्यक्ष नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन साकोली तथा ग्राम पंचायत सदस्य खैरलांजी यांचे नेतृत्वात आदिवासी संस्कृतीवर आधारित गावातून महारॅली काढण्यात आली व रात्रीला सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप सयाम सहाय्यक शिक्षक पिंडकेपार व उदघाटक तुळशिदास कुंभरे मुख्याध्यापक आदिवासी आश्रमशाळा खडकी तर दिप प्रज्वलन चंदाताई नेटीनकर आरोग्य विस्तार अधिकारी पं.स.साकोली तसेच विशेष अतिथी धर्मराजभाऊ भलावी जिल्हाध्यक्ष नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन भंडारा, प्रमुख पाहुणे म्हणून छायाताई टेकाम जिल्हाध्यक्ष, नॅशनल आदिवासी महिला फेडरेशन, गोंदिया, आशाताई भलावी तालुका महासचिव नॅशनल आदिवासी महिला फेडरेशन साकोली, नरेश कुंभरे तालुका संघटक, ललित कुंभरे विस्तार अधिकारी पं.स.साकोली, लिलाबाई वलके सामा.काय.साकोली, दिलीप सयाम लाईनमेन जमनापूर, रमेश नेटीनकर आरोग्य विभाग साकोली, कौशल्या पुरामकर मा.उपसरपंच, गणेश टिकेकर ग्राम पंचायत सदस्य जमनापूर, कल्याणीताई घोरमारे मा.ग्रा.प.सदस्य, कविताई मेश्राम अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, वंदनाताई चंद्रिकापूरे अंगणवाडी सेविका यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी धर्मराजभाऊ भलावी यांनी समाज बांधवांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, आपल्या पाल्याला शिक्षित करा, उच्च शिक्षित करा परंतु सुसंस्कृत करा कारण आजकालचे विद्यार्थीमध्ये पुस्तके वाचण्यापेक्षा मोबाईल फोनचा जास्त वापर करताना दिसतात.त्यामुळे समाजात अनुचित प्रकार घडतात म्हणून पालकांनी आपल्या पाल्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसेच आदिवासी संस्कृती एक महान संस्कृती आहे ती जतन करण्याची आवश्यकता आहे परंतु आजकाल आदिवासी संस्कृती लोप पावत चालली आहे तीला जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या घरी आदिवासी संस्कृतीनुसार आपले विधी कार्य पार पाडले पाहिजे तेव्हाच ती जिवंत राहिल व येणा-या पिढीला ती जोपासता येईल. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी समाज बांधवांना मार्गदर्शन केले. सांस्कातिक कार्यक्रमात दोडके जांभळी, सोनेगाव, खंडाळा, बोंडे, पिंडकेपार, बोदरा, खैरलांजी येथिल डॉन्स गृपने गोंडी संस्कृतीवर आधारित डॉन्स सादर केले. कार्यक्रमाचे संचालन केशव भलावी यांनी केले तर प्रास्ताविक ओमप्रकाश कुंभरे यांनी व आभार हरिभाऊ येळणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपक न्यायमुर्ते, राजेश मंडारे, नंदकिशोर येळणे, धनराज नैताम, तुळशीराम सिडाम, राजेश पुरामकर, हेमराज सिडाम, सुनील पुरामकर, राजेश धुर्वे, भारती नैताम, हेमलता सिडाम, गीता येळणे, काविता वाळवे, रोशना टेकाम, ललिता कुंभरे, नैना पुरामकर, आशा सिडाम, शैला कुंभरे, छाया येळणे, अंकोश पुरामकर, कांचन सिडाम, विशाल मंडारे, सुयोग येळणे, विनोद सिडाम, विजय मंडारे, अनिकेत कुंभरे, विशाल सिडाम, देविदास पुरामकर, पवन मसराम व फेडरेशनचे सदस्य यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने समाज बांधव व गावकरी उपस्थित होते.

## अवैधरित्या रेती वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टर ड्राव्हरने पोलीस वाहन उडविण्याच्या केला प्रयत्न

**मोहाडी :** मोहाडी पोलीस स्टेशन अंतर्गत यातील फिर्यादी विनोद यादोराय थोटे हे पो.स्टॉफसह पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपी ट्रॅक्टर चालक हे वैनगंगा नदीपात्रातून अवैधरित्या ट्रॅक्टर ट्राली ने संगनमत करूण रेती चोरी करूण नेत असता यातील फिर्यादी व सहकारी यानी त्यांना पकडण्याचा पर्यन्त करीत असता ट्रॅक्टर ने पोलीस वाहनाला कट मारून उजव्या साईड चे मिरर व दाराला घासून नुकसान केले व फिर्यादी व सहकारी यांचे अंगावर ट्रॅक्टर आणण्याचा पर्यन्त केला वरील राजेश उयकर, , लोकेश वनवे , राहूल बांडेबूचे रा तिन्हीं रा. रोहा ता. मोहाडी जिल्हा भडारा. आरोपी पळून गेले त्याच्या ताब्यातील माल एक निळ्या रंगाचे स्वराज कंपनीचा विना क्रमांकाचे ट्रॅक्टर,दुसरा ट्रॅक्टर बिना नंबरचा ट्रक्टर व ट्राली किमत अदाजे ५,००,०००/- रू.चा माल. २) स्वराज कपनीचा ट्रक्टर व ट्राली नंबर माहीत नसलेला अदाजे कि ५,००,०००/- रू.३) अंदाजे ०२ ब्रास रेती किंमती १४०००/- रू.ची. असे एकूण किंमत १०,१४०००/रू. चा माल विना पास परवाना अवैध रित्या रेती चोरी वाहतुक करतांना मिळुन आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १३२.३०३(२), ३२४(४) ,३(५). भा.न्या.सं.२०२३ सहकलम ४८(८) महा जमीन, महसुल अधि सहकलम ७.९ पर्यावरण संरक्षण अ चि सहकलम, ३ (१), १.३९ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

# भंडारा पत्रकार भवन महाराष्ट्रात नावारूपास येणार : आ. नरेंद्र भोंडेकर

## पत्रकार दिन कार्यक्रमाप्रसंगी सर्वतोपरी मदत देण्याचे आश्वासन




**महासागर जिल्हाप्रतिनिधी**
**भंडारा दि.०६:** दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे दि.६ जानेवारी २०२५ रोजी पत्रकार भवनात पत्रकार दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भंडारा जिल्हा मराठी पत्रकार भवन महाराष्ट्रात नावारूपास येणार आहे. पत्रकार भवनाच्या इमारती करिता जेवढी मदत लागेल ते सर्वतोपरी देण्याचे आश्वासन आ. नरेंद्र भोंडेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने समित्यांची घोषणा करण्यात आली.

याप्रसंगी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली.

यावेळी मंचावर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे, भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन भैरम, जिल्हा माहिती अधिकारी शैलेजा वाघ, सचिव मिलिंद हळवे, उपाध्यक्ष राकेश चेटुले, कोषाध्यक्ष डी.एफ. कोचे, वरिष्ठ पत्रकार गोपालकृष्ण मांडवकर, हिवराज उके, मो.आबिद सिद्दीकी आदी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी आ. नरेंद्र भोंडेकर यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच भारताच्या आट्यापाट्या संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्राची केशव चटप हिचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी छत्तीसगड राज्यातील बस्तर जिल्ह्यातील एनडीटीव्ही प्रतिनिधी दिवंगत चंद्रहार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

मराठी पत्रकार भवन हे महाराष्ट्रात एकमेव असे पत्रकार भवन उभारण्यासाठी आपला सदैव पाठबळ राहणार आहे. यासाठी जेवढा निधी लागेल तेवढा निधी देण्यास आपण कटिबध्द आहे. पत्रकार भवन दोन मजली करण्याचा मानस असून झालेल्या ८० टक्के बांधकामामुळे आपण समाधानी असल्याचे मत यावेळी आ. नरेंद्र भोंडेकर यांनी उपस्थित पत्रकारांसमोर व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन भैरम यांनी केले. कार्यक्रमाला जिल्हा माहिती अधिकारी शैलेजा वाघ यांनी बदलत्या काळातील तंत्रज्ञान हे पत्रकारांना अवलंबण्याची गरज आहे तरच पत्रकारितेच्या क्षेत्रात पत्रकार टिकेल असे मार्गदर्शन करताना सांगितले. पत्रकारासंबंधी मिळणाऱ्या सुविधांची शासन केवळ घोषणा करते मात्र त्याची पुर्तता होत नसल्याची खंत वरिष्ठ पत्रकार गोपालकृष्ण मांडवकर यांनी व्यक्त केली.

यावेळी भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव मिलिंद हळवे, वरिष्ठ पत्रकार हिवराज उके, माजी सचिव मो.आबिद सिद्दीकी यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डी.एफ. कोचे यांनी केले तर आभार राकेश चेटुले यांनी मानले. कार्यक्रमाला चंद्रकांत श्रीकोंडावार, विलास केजरकर, दीपक रोहनकर, सुरेश कोटगले, ललितसिंह बाच्छिल, राजू आगलावे, चंद्रकांत शहारे, देवानंद नंदेश्वर, इंद्रपाल कटकवार, शशिकांत भोयर, समीर नवाज, शेखर बोरकर, अजय मेश्राम, प्रवीण तांडेकर, सरवर शेख, उमेश जांगळे, सचिन मेश्राम, नवीन निश्चल, सैय्यद जाफरी, प्रशांत देसाई, मनोज देशमुख, वामन चांदेवार, येनोरकर, हंसराज रामटेके, नितीन कुथे, सुरेश फुलसुंगे, युवराज गोमासे, अनमोल मेश्राम, घनश्याम खडसे, जयकृष्ण बावणकुळे, सुधीर गोमासे, दिलीप बडोले, यशवंत थोटे, संजीव जयस्वाल, मनोहर मेश्राम, अमित गिऱ्हेपुंजे, कृष्णा बावनकुळे, सुरेंद्र चिंधालोरे, प्रमोद रणदिवे, शत्रुघ्न भांडारकर, स्वप्नील मेश्राम, अनिल रहांगडाले, सुरज निंबार्ते, नरेश बोंदरे, मुकेश मेश्राम, देवराम फटे, प्रल्हाद हुमने, विरेंद्र गजभिये, संजय भोयर, पृथ्वीराज बन्सोड आदींसह मोठ्या संख्येने पत्रकार बंधू उपस्थित होते.

### पत्रकार भवनात विद्यार्थ्यासाठी ई-लायब्ररीची गरज : सुनील फुंडे

भंडारा शहराच्या मध्यवर्ती भागात भंडारा जिल्हा मराठी पत्रकारसंघाची भव्यदिव्य पत्रकार भवन उदयास येत आहे. जिल्ह्यात एमआयडीसीसारख्या जागा असूनही पाहिजे त्याप्रमाणात उद्योगधंदे नसल्याने बेरोजगारी फोफावली आहे. सध्या स्पर्धेचे युग आहे. ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेत टिकण्यासाठी सोय नसल्याने असे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत मागे पडत आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी पत्रकारसंघात ई-लायब्ररीची संकल्पना जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे यांनी मांडली. जेणेकरून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना फायदा होईल. तसेच शेतकऱ्यांनी परंपरागत धान शेती न करता इतर पिकाचे उत्पादन घ्यावे. भंडारा जिल्हा हा भाताच्या जिल्ह्यासोबतच रेतीचा जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. मात्र जिल्ह्यात घरकुलासाठी महाग दराने रेती घ्यावी लागते. ही एक शोकांतिका असल्याचे मत सुनील फुंडे यांनी पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सांगितले.




## समाजासाठी संघटित होऊन लढावे: शुभांगी मेंढे



**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.०६:** संघटित शक्तीतून सशक्त समाज उभा राहतो. समाजाच्या कल्याणकारी निणऱ्याची मुहूर्तमेढ समाज मंडपाच्या माध्यमातून रोवली जाते. समाज बांधवांनी एकत्रित राहून, न्याय हक्कासाठी लढावे असे आवाहन शुभांगी सुनील मेंढे यांनी केले.

भंडारा तालुक्यातील उसरा गोंदी येथे बिरसा मुंडा आदिवासी बांधवांच्या वतीने आयोजित सभामंडप लोकार्पण सोहळ्यात त्या बोलत होत्या. तत्कालीन खासदार सुनील मेंढे यांच्या स्थानिक विकास निधीतून ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत दहा लाख रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या बिरसा मुंडा सभा मंडपाचे लोकार्पण ५ जानेवारी रोजी करण्यात आले, यावेळी उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे गटनेते विनोद बांते, हिरामण उईके, टेकेपारच्या सरपंच शारदा शेंडे, जगदीश उईके, कांचन निम्बार्ते, भूमेश्वर वरठे, श्रीकांत कंगाले, राहुल मेश्राम, माधव ईळपाते, गौरीशंकर धुर्वे, श्रीकृष्ण उईके याच्यासह अन्य मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना शुभांगी मेंढे यांनी, एकत्रित राहूनच समाजाचे हित साधले जाऊ शकते, असे सांगितले. खासदार असताना सुनील मेंढे यांनी अनेक विकासाची कामे केली. त्यांच्या निधीतून तयार झालेले हे सभामंडप समाजाला कायमच दिशा देत राहील असेही त्या म्हणाल्या.

## करंजेकर कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड मॅनेजमेंट, येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.०६:** वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्था द्वारा संचालित, करंजेकर कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड मॅनेजमेंट, साकोली येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' च्या निमित्त १ ते १५ जाने वाचन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. ग्रंथालय स्वच्छता,ग्रंथ प्रदर्शनी, वाचन कौशल्य कार्यशाळा इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.तसेच लेखक आणि विद्यार्थी यांच्यातील वाचन संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी डॉ.जितेंद्र कुमार ठाकूर, आणि डॉ.अंजनकुमार सहाय यांना आमंत्रित करण्यात आले होते. यांनी विद्यार्थ्यांशी वाचन संबंधीत विविध विषयांवर चर्चा केली. डॉ.जितेंद्र कुमार ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की वाचन करतांना ग्रंथ आणि वाचक यामध्ये किती अंतर असावे, कसे बसावे, शक्यतो वाचन कोणत्या वेळी करावे, वाचन करतांना एकाग्रता कशी साधावी अशा विविध विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले. तर डॉ.अंजनकुमार सहाय यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा जसे ई-बुक, ई-जर्नल्स, ऑनलाइन माहीती यांचा वाचनात कसा समावेश करावा तसेच चॅट जीपीटी सारखे आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञान आले असले तरी संभाषण कौशल्य, उच्चार सुधारण्या करीता वाचन कसे आवश्यक आहे हे पटवून दिले.




प्राचार्य डॉ.नागेंद्र डहरवाल यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी वाचन किती आवश्यक याबद्दल सांगितले. तसेच प्रा.एस.एम. पडोळे यांनी ग्रंथालयात उपलब्ध विविध वाचनसाहीत्य आणि वाचनस्त्रोत याविषयी माहीती दिली तसेच उपक्रमा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धे विषयी माहीती दिली आणि दि.१४ / ०१/ २०२५ ला स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी भाग घेण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे संचालन प्रा अनुष्का सिंग यांनी केले. आभार प्रा.रोशन गायधने यांनी मानले.

## अयशस्वी विद्यार्थ्यांनी अपयश पचवुन नव्याने सुरुवात करावी : विस्तार अधिकारी भगवान वरवटे

### शिवाजी हायस्कुल तथा कनिष्ठ कृषी महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचा बक्षिस वितरण सोहळा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**
**लाखांदूर दि.०६:** शाळेसह जीवनातील विविध स्पर्धांना सामोरे जातांना यश अपयश येतातच माञ अपयश आल्यावर त्याला खचून न जाता कोणतेही टोकाचे पाऊल न उचलता ते अपयश पचवून नव्याने सुरुवात करून यशाचे ऊंच शिखर गाठावे असे प्रतिपादन विस्तार अधिकारी भगवान वरवटे यांनी व्यक्त केले. ते ५ जानेवारी रोजी स्थानिक लाखांदूर येथील शिवाजी हायस्कूल तथा कनिष्ठ कृषी महाविद्यालयात आयोजित स्नेहसंमेलनाच्या बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख वक्ते या स्थानावरुन बोलत होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन लाखांदूर नगरपंचायत चे उपाध्यक्ष प्रल्हाद देशमुख तर उपाध्यक्ष म्हणुन भारतीय शिक्षण संस्थेचे सहकार्यवाह चंद्रकांत दिवठे ऊपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन सेवानिवृत्त शिक्षक मनोहर ढोरे, देवराम कापगते, वसंता शिंदे, सरपंच सुलभा बुरडे, मुलचंद गहाणे, अजय कोडापे, भाष्कर अलोणे, पुरुषोत्तम जिभकाटे, प्राचार्य अर्जुन राठोड, प्रेरणा कापगते, अतुल भुरले, रामदास सावरकर, सुरेखा देसाई, सुनिल ठाकरे, रामचंद्र ठाकरे, विजय खरकाटे, विद्यार्थी प्रतिनीधी विनायक हेमणे, विद्यार्थीनी प्रतिनीधी रिया झोडे यांसह अन्य मान्यवर ऊपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, शाळा स्तरावर विद्यार्थ्यांच्या विविध सूप्त गुण ओळखण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. शाळे व्यतिरिक्त दैनंदिन जीवन जगतांना विविध स्पर्धांना सामोरे जावे लागते. या स्पर्धांमध्ये यश अपयश मिळतच राहते मात्र अपयश मिळाल्यावर अनेकजण टोकाचे पाऊल उचलताना दिसतात माञ त्या अपयशाला खचुन न जाता पुन्हा नव्याने सुरुवात करावी अधिक जोमाने त्या क्षेत्रात पदार्पण करून यशाचे शिखर गाठावे असेही त्यांनी सांगीतले. दैनंदिन जीवनात खेळाचे अधिकच महत्त्व आहे. खेळामुळे शरीरयष्टी योग्य होते. खेळाडूमध्ये वेळेचे नियोजन करण्याची उत्तम कला असते.




खेळणाऱ्या खेळाडूंमध्ये प्रामाणिकपणासह नियमितता दिसून येते. खेळ खेळल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिद्द, चिकाटी व ध्येयवेडेपणा वाढतो व त्यातूनच तो यशस्वी नागरिक होण्यास मदत होते. हाच यशस्वी नागरिक स्वतःसह शाळेचे, गावाचे व देशाचे नाव उज्वल करीत असल्याचे मत वरवटे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक महाविद्यालयाचे तोषित नाकतोडे, संचालन शैलेष प्रधान तर आभार मंगला मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्विततेसाठी योगेश चौधरी, छाया दोनाडकर, मनोज लोथे, पियुष मेश्राम, हर्षा शहारे, सुधा मोटघरे, प्रेरणा कापगते, सिमा चौधरी, शशिकला कडुकर, ईमदेव नागोसे, पुरुषोत्तम जिभकाटे, आनंदराव ठाकरे, दिगांबर टेंभुर्णे, दुर्गेश दिवठे, जयंत बोरकर, हरीकृष्ण दिवठे, दयाल भोवते, लुईस रहेले, मधुकर जायभाये, राजश्री भर्रे, शुद्धशिला सुखदेवे, ज्योती खरकाटे, नम्रता कांबळे, राजश्री हुमणे, वैशाली बनकर, खरकाटे, मंगेश मोहुर्ले यांसह अन्यथा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## गर्भ जल लिंग परीक्षण कायद्याने गुन्हा

**भडारा :** स्त्रीभृण हत्या करणाऱ्यांचे नाव कळवा आणि १ लाख रोख मिळवा , असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दीपचंद सोयाम यांनी केले आहे. गर्भलिंग परिक्षण करुन भृण मुलगी असल्यास तिला गर्भातच मारले जाणे हा कायद्याने गुन्हा आहे. तसेच गर्भलिंगदान होत असल्यास हेल्पलाईन क्रमांक १८००२३३४४७५ यावर संपर्क करा असे आवाहन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. दीपचंद सोयाम यांनी कळविले आहे.

## विदर्भवादी शेतकरी संघटना निराधारा करिता आक्रमक




**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.०६:** आज विदर्भवादी शेतकरी संघर्ष समिती तर्फे भंडारा जिल्हाधिकारी यांना शेतकरी , वृद्ध महिला व दिव्यांग्य निराधार यांचे थकीत असलेले मानधन मिळण्याबाबत निवेदन देण्यात आले.

शेतकरी, शेतमजूर, श्रावणबाळ, वृद्ध विधवा महिला व दिव्यांग, निराधार यांचे सहा महिन्यापासून थकीत असलेले मानधन तात्काळ मिळण्याबाबद यावेळी त्यांच्या खालील प्रमुख मागण्या १. शेतकरी, शेतमजूर, श्रावणबाळ, वृद्ध विधवा महिला व दिव्यांग, निराधार याना सन १९९४ च्या किमान सन्मान पेन्शन योजनेअंतर्गत सवोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ६००० रू. महिना देण्यात यावा. शेतकऱ्याना कर्जमाफी देण्यात यावी. व भूमिहीन लोकांना घराचे पट्टे देण्यात यावे. २००६ ला झालेला शेतकऱ्याच्या हिताचा स्वामी नाथन आयोग लागू करावा. शेतकऱ्याला बी बियाणे ५० टक्के सबसिडीवर देण्यात यावे. शेतकऱ्याला वीज बीळ माफ करण्यात यावा.

या मागण्यांकारिता निवेदन देण्यात आले.

व वरील मागण्या मान्य न झाल्यास विदर्भवादी शेतकरी समिती यांचा बेमुदत आमरण उपोषण दिनांक २५/०२/२०२५ ला त्रिमूर्ती चौक भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येईल. असे सांगण्यात आले .

यावेळी विदर्भवादी शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष सदानंदजी धारगावे , विदर्भवादी शेतकरी संघर्ष समितीचे उपाध्यक्ष सौ. नम्रताताई बागडे, सीमा काळे, सिमा सुखदेवे, विनता अनिल बागडे, कांचना बागडे , कुरुना अनमोल बागडे , पुष्पा रोडगे, वंदना वालकर, शशिकला कांबळे, जयवंता बागडे, कविता मेश्राम, मनोरमा रामटेके, इराबाई राऊत, शांताबाई रामटेके, रंजना बडोले, पांडुरंग नांदगवली व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## रेती तस्करांविरुद्ध पोलिसांची कारवाई

### १९.२२ लाखांचा माल जप्त, आरोपी अटक

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली :** तहसीलच्या परसोडी रेती घाट परिसरात पोलिसांनी अवैध वाळू चोरीवर कारवाई करत चार ट्रॅक्टर-ट्रॉलीसह १९.२२ लाख रुपयांचा माल जप्त केला आहे. साकोली पोलिसांनी मंगळवारी सकाळी ८.३० वाजता ही कारवाई केली. या कारवाईमुळे वाळू तस्करांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी परसोडी रेती घाटात अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर छापा टाकला.



यावेळी चार ट्रॅक्टर-ट्रॉलींसह वाहन चालक व मालकावर विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली. गोंडउमरी रा. रवींद्र बाबुराव येसनसुरे (३५), राजकुमार महारू चांदेवार (४०), उमेश तेजराम राऊत (३७), सुभाष यशवंत चांदेवार (३२), रविकुमार हेमराज चांदेवार (३५), योगेश सुरेश चांदेवार (२८), अशी आरोपींची नावे आहेत. राजू मोहन चांदेवार (३०) एकूण १९, २२, ००० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्याची नोंद पोलीस हवालदार काशिनाथ झांजाळ यांनी केली असून पुढील तपास संदीप भगत करीत आहेत.

RNI No.- MAHAMAR-2010/35801
महासागर भंडारा
मालक, मुद्रक, प्रकाशक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन - ०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-सुरेश लक्ष्मण कोटगले, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

